असा. क्र. ४६ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

मंगळवार फेब्रुवारी १७, २००४/माघ २८, शके १९२५

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ फेब्रुवारी २००४

### अधिसूचना

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.**

क्रमांक व्हीपीएम. २६९९/सीआर. १०७१/पीआर-४ (२२).——मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई ३) याच्या कलम १७६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (सोळा) आणि (सत्तेचाळीस) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने मुंबई जिल्हा ग्रामपंचायत (अर्थसंकल्प व लेखा) नियम, १९५९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी जे नियम करण्याचे योजिले आहे त्या नियमांचा पुढील मसुदा त्याद्वारे बाधा पोहोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता उक्त कलम १७६ च्या पोट-कलम (४) द्वारे आवश्यक केल्याप्रमाणे, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा, महाराष्ट्र शासन दिनांक १७ फेब्रुवारी २००४ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेईल.



Scanned with OKEN Scanner

२. उक्त मसुद्याच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीकडून जे कोणतेही आक्षेप व सूचना, उपरोक्त दिनांकापूर्वी, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे येतील, त्यावर शासनाकडून विचार करण्यात येईल.

## नियमांचा मसुदा

१. या नियमांना मुंबई ग्रामपंचायत (अर्थसंकल्प व लेखा) (सुधारणा) नियम, २००४ असे म्हणावे.

२. मुंबई ग्रामपंचायत (अर्थ संकल्प व लेखा) नियम, १९५९ च्या नियम ७ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईल :--

"७. पंचायत, प्रत्येक वित्तीय वर्षी कलम १३३ अन्वये घटित करण्यात आलेल्या जिल्हा ग्राम विकास निधीस, मागील वित्तीय वर्षात सर्व स्त्रोतांपासून (शासनाकडून मिळालेल्या अंशदानासह) उभारलेल्या तिच्या उत्पन्नाच्या ०.२५ टक्के इतके अंशदान देईल.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कुंदा गोसावी,**
शासनाच्या उप सचिव.

Scanned with OKEN Scanner

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the17th February 2004

### *NOTIFICATION*

BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.

No. VPM. 2699/CR. 1071/PR.-4(22).—The following draft of rules further to amend the Bombay Village Panchayats (Budget and Accounts) Rules, 1959, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clauses (*xvi*) and (*xlvii*) of sub-section (2) of section 176 of the Bombay Village Panchayats Act, 1958 (Bom. III of 1959), and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*4*) of the said section 176 for the information of all persons likely to be affected therby, and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 17th day of February 2004.

2. Any objections and suggestions which may be received by the Principal Secretary to the Government of Maharashtra, Rural Development Department, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft before the aforesaid date, will be considered by the Government.

### *DRAFT RULES*

1. These rules may be called the Bombay Village Panchayats (Budget and Accounts) (Amendment) Rules, 2004.

2. For rule 7 of the Bombay Village Panchayats (Budget and Accounts) Rules, 1959, the following rule shall be substituted, namely :—

"7. A *Panchayat* shall contribute, every financial year, to the District Village Development Fund constituted under section 133, 0.25 per cent. of its income raised during the preceding financial year from all sources (including contributions from the State Government).".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KUNDA GOSAVI,
Deputy Secretary to Government.

Scanned with OKEN Scanner

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ फेब्रुवारी २००४

### अधिसूचना

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.**

क्रमांक व्हीपीएम. २६९९/सीआर. १०७१/पीआर-४ (२२).—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई ३) याच्या कलम १७६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (छत्तीस), आणि कलम १३३ यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, मुंबई जिल्हा ग्राम विकास निधी नियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी जे नियम करण्याचे योजिले आहे त्या नियमांचा पुढील मसुदा, त्यामुळे बाधा पोहोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता उक्त कलम [illegible] पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा महाराष्ट्र शासन दिनांक १७ फेब्रुवारी २००४ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेईल.

२. उपरोक्त तारखेपूर्वी उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून जे कोणतेही आक्षेप किंवा सूचना, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे येतील, त्यावर शासन विचार करील.

### नियमांचा मसुदा

१. या नियमांना मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी (सुधारणा) नियम, २००४ असे म्हणावे.

२. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी नियम, १९६० (यात यापुढे ज्यांचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे.) याच्या नियम ६ मध्ये, पोट-नियम (२) नंतर, पुढील पोट-नियम समाविष्ट करण्यात येईल :—

(२-अ) जिल्हा ग्रामविकास निधीतील बरीचशी रक्कम वापरावयाची राहून गेली आहे, आणि त्याच्या तुलनेत कर्जाच्या मागण्या फारशा नाहीत, तसेच, ग्रामीण भागाच्या विकासासाठी असा निधी आवश्यक आहे, असे राज्य शासनाच्या निदर्शनास आल्यास, अशा परिस्थितीत, राज्य शासनास राज्य शासनाच्या यशवंत ग्राम समृद्धी योजनेच्या अंमलबजावणीसाठी पंचायतींना कर्ज म्हणून त्या पंचायतींच्या शिल्लक अंशदान रकमेच्या प्रमाणानुसार अशा निधीच्या काही टक्केवारीचे वाटप करण्याचे स्थायी समितीला अनुदेश देता येतील. अशा कर्जावर नियम १३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणतेही व्याज आकारण्यात येणार नाही. तथापि, अशा व्याजमुक्त कर्जाची नियम १२ मध्ये विहीत केलेल्या रीतीने परतफेड करता येईल.

Scanned with OKEN Scanner

३. मुख्य नियमांच्या नियम १२ मध्ये,--

(क) पोट-नियम (१) मध्ये,--

(एक) " दहा वर्षांहून अधिक नाही " या मजकुराऐवजी, " वीस वर्षांहून अधिक नाही " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) पहिल्या परंतुकामध्ये, " पंधरा वर्षे " या मजकुराऐवजी, " पंचवीस वर्षे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-नियम (२) च्या परंतुकामध्ये,--

(एक) " दहा वर्षे " या मजकुराऐवजी, " वीस वर्षे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " पंधरा वर्षे " या मजकुराऐवजी, " पंचवीस वर्षे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कुंदा गोसावी,**
शासनाच्या उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the17th February 2004

### *NOTIFICATION*

BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.

No. VPM. 2699/CR. 1071/PR.-4(22).—The following draft of rules further to amend the Bombay District Village Development Fund Rules, 1960, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (*xxxvi*) of sub-section (*2*) of section 176 read with section 133 of the Bombay Village Panchayats Act, 1958 (Bom. III of 1959), and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*4*) of the said section 176 for the information of all persons likely to be affected thereby, and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 17th day of February 2004.

2. Any objections and suggestions which may be received by the Principal Secretary to the Government of Maharashtra, Rural Development Department, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft before the aforesaid date, will be considered by the Government.

### *DRAFT RULES*

1. These rules may be called the Bombay District Village Development Fund (Amendment) Rules, 2004.

2. In rule 6 of the Bombay District Village Development Fund Rules, 1960 (hereinafter referred to as " the principal Rules "), after sub-rule (2), the following sub-rule shall be inserted, namely :—

" (*2-a*) If it comes to the notice of the State Government that a considerable amount is remained unused in the District Village Development Fund, and there are no proportionate demands of loan, and also such fund is required for the development of rural areas, in such circumstances the State Government may instruct the Standing Committee to allocate out of the certain percentage of such fund to the *Panchayats* as a loan for implementation of the *Yeshwant Gram Samruddhi Yojana* of the State Government, in proportion to the extent of balance contribution amount of the concerned *panchayat*. On such loan no any interest as mentioned in rule 13 shall be charged. However, such interest free loan shall be repayable in the manner prescribed in rule 12.".

Scanned with OKEN Scanner

3. In rule 12 of the principal Rules,—

(*a*) in sub-rule (*1*),—

(*i*) for the words " not exceeding ten years " the words " not exceeding twenty years " shall be substituted ;

(*ii*) in the first proviso, for the words " fifteen years " the words " twenty-five years " shall be substituted ;

(*b*) in the proviso to sub-rule (*2*),—

(*i*) for the words " ten years " the words " twenty years " shall be substituted ;

(*ii*) for the words " fifteen years " the words " twenty-five years " shall be substituted ;

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KUNDA GOSAVI,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

Scanned with OKEN Scanner